# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)

कुलसचिव

दुरध्वनी : ०७२४-२२५८३७२

E-Mail : registrar@pdkv.ac.in


संदर्भ : १) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२४/प्र.क्र.१५७/१० ए दिनांक १४ ऑक्टोंबर, २०२४.

२) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य, पुणे) यांनी मा. जिल्हाधिकारी (सर्व) यांना निर्गमित केलेली सुचना पत्र क्र. रा.भू.-२/DCS/रब्बी/२०२५ दिनांक १०/१२/२०२५.

## परिपत्रक

जा.क्र. साप्रवि/जमिन/ई-पीकपाहाणी/2860 /२०२५ दिनांक : १५ डिसेंबर, २०२५

पीक पेरणीची माहिती भ्रमणध्वनीवरील ॲपव्दारा (Mobile App) नोंदविण्यासाठी स्वत: शेतकऱ्यांनी उपलब्ध करुन देण्याचा शासनाने "ई-पीक पाहाणी" कार्यक्रम संपूर्ण राज्यात राबविण्याकरीता शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. संदर्भिय शासन निर्णयाव्दारे संपुर्ण राज्यमध्ये AgriStack संकल्पने अंतर्गत हंगामी पीकांचा माहिती संच, ई-पीक पाहणी डिजीटल क्रॉप सर्व्हे (DCS) मोबाईल ॲपव्दारे पिकांची नोंदणी सुरु आहे. सदर संकल्पनेअंतर्गत शेतकरी स्तरावर तसेच सहायक स्तरावर मोबाईल ॲपव्दारे पिकांची नोंद करता येते.

तसेच मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य, पुणे) यांनी मा. जिल्हाधिकारी (सर्व) यांना संदर्भ क्रमांक २ नुसार सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

रब्बी हंगाम २०२५-२६ साठी आवश्यक असणारे ई-पीक पाहणी डिजीटल क्रॉप सर्व्हे (DCS) वापरण्यास सुसज्ज असुन Google play store वर उपलब्ध आहे. तसेच संदर्भिय पत्र क्रमांक २ अन्वये पिक पेरणीसाठी हंगामाची निश्चिती करण्यात आलेली असुन रब्बी हंगाम २०२५-२६ करीता "ई-पीक पाहाणी" डिजीटल क्रॉप सर्व्हे (DCS) मोबाईल ॲपव्दारे पिक नोंदणी दिनांक १०/१२/२०२५ पासुन सुरु करण्यात आलेली आहे. नोंदणीचा कालावधी २४ जानेवारी, २०२६ पर्यत असुन १००% पीक पाहणी नोंद पुर्ण करण्याचे शासनाचे निर्देश आहेत.

त्याअनुषंगाने या परिपत्रकाव्दारे विद्यापीठातील सर्व (संबंधित) विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख / प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय/ कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र/ प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र/ सहयोगी अधिष्ठाता व इतर संबंधित अधिकारी यांना कळविण्यात येते की, संदर्भिय शासन निर्देशानुसार विद्यापीठाच्या रब्बी हंगाम २०२५-२६ करीता असलेल्या पीकांची मोबाईल ॲपव्दारे नोंदणी करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी. सदर नोंद करणेबाबतची मुदत २४ जानेवारी, २०२६ पर्यत आहे.

याप्रकरणी सर्व नियंत्रण अधिकारी यांनी वेळोवळी आढावा घेवून १००% पीक पाहणी नोंद पुर्ण करण्याचे उद्दिष्ट पुर्ण करावे.

याबाबत काही अडचण असल्यास संबंधित तलाठी / मंडळ अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

सदर परिपत्रक सर्व संबंधितांचे निर्दशनास आणुन कार्यवाही करावी.

कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रतिलीपी आवश्यक कार्यवाहीकरीता :

१) सहयोगी अधिष्ठाता (सर्व) ----------------------------------------------------------------------

२) संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, अकोला/ मुख्य बिजोत्पादन अधिकारी, म.प्रा.प्र., वणी रंभापूर

३) विभाग प्रमुख, कृषि विद्या / उद्यानविद्या/ पशु संवर्धन व दुग्धशास्त्र विभाग -------------------------------

(कृ.मा.पाहा)

४) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र (सर्व) --------------------------------

५) प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय (सर्व) ------------------------------------------------------------------

६) कार्यक्रम समन्वयक (सर्व) ----------------------------------------------------------------------------------

७) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष (ARIS Cell), यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

प्रत माहितीकरीता सादर :

१) मा. अधिष्ठाता (कृषि) / संशोधन संचालक / संचालक, विस्तार शिक्षण /अधिष्ठाता (कृषि अभियांत्रिकी) / अधिष्ठाता (उद्यानविद्या) / सहयोगी अधिष्ठाता, निम्न कृषि शिक्षण/ नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.

२) मा. कुलगुरू यांचे स्विय सहायक यांना मा. कुलगुरू महोदय यांचे माहितीकरीता सादर.

Inward No. 555 16/12/2025